# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ०४-२३** **दिनांक ०३/०१/२०२३**

## ०५ किलो गांजासह दोन सराईत आरोपीत यांना अटक - पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- ०२/०१/२०२३ रोजी दुपारच्या सुमारास बिलालपाडा तलाव, बिलालपाडा, नालासोपारा (पु.), ता. वसई येथे एक इसम गांजा विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोअं/सचिन बळीद यांना मिळाली. सदर बातमीचे आधारे मिळालेले बातमीचा आशय वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना कळवुन त्यांनी दिलेले आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपीत यांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीत यांनी त्यांची नावे १) मैदुल शेख ऊर्फ बंगाली, रा. बिलालपाडा, नालासोपारा पुर्व २) सुनिल पवार, रा. नालासोपारा(प.) अशी असून नमुद आरोपीतांची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात ०५ किलो ५० ग्रॅम वजनाचा ७३,५००/- रुपये किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ, ५,५००/- रुपये रोख रक्कम व एक मोटार सायकल असा एकुण- १,२९,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ।। १३/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ (NDPS) अधिनियम-१९८५ चे कलम-८(क), २०(ब) प्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांना तपासकामी मा. न्यायालयाने दिनांक ७/०१/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

सदरची कारवाई श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे), अतिरिक्त कार्यभार सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-------------ooooo-------------